# भरती

## भारत सरकार संरक्षण मंत्रालय

# एम्प्लॉयमेंट सूचना : ग्रुप सी आणि डी पदे

## HQ MG & G AREA (ST) BRANCH

१. खाली नमूद केलेल्या पदांसाठी पात्र भारतीय राष्ट्रीयत्त्वाच्या उमेदवारांकडून विहित नमुन्यात खाली दिलेल्या ठिकाणी कागदपत्रांच्या झेरॉक्स प्रती जोडून अर्ज मागविण्यात येत आहेत. **ऑफिसर कमांडिंग, ७५२ ट्रान्स्पोर्ट कंपनी (सिव्हिल जीटी), रॉस रोड, रेस कोर्सजवळ, पुणे, पिन ४११ ००१ (महाराष्ट्र) येथे स्पीड/ साध्या पोस्टाद्वारे** एम्प्लॉयमेंट न्युजमध्ये ही जाहिरात प्रसिद्ध झाल्यापासून २१ दिवसांत (जे उमेदवार अंदमान आणि निकोबार बेटे आणि लक्षद्वीप विभागातील आहेत त्यांच्यासाठी २८ दिवस) पाठवावेत.

| पदाच्या नावासह वेतनश्रेणी ७ व्या सीपीसी वेतनश्रेणीनुसार | युनिट | पदे | | | | | | | | युनिटचे ठिकाण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | खुला | अजा | अज | इमाव | ईएसएम | ईडब्ल्यूएस | एमएसपी | अपंग | |
| मजूर (श्रेणी-१ रु.१८०००/-) | 55 Coy ASC Supply Type D | ०२ | - | ०१ | ०२ | - | | - | - | खडकी (पुणे) महाराष्ट्र |
| चौकीदार (श्रेणी-१ रु.१८०००/-) | | ०२ | - | - | - | - | - | - | - | |
| मजूर (श्रेणी-१ रु.१८०००/-) | 204 Pet Pl ASC | - | - | - | ०१ | - | - | - | - | खडकी (पुणे)महाराष्ट्र |
| सिव्हिल मोटार ड्रायव्हर (श्रेणी-२ रु.१९९००) | 757(I) Tpt Pl ASC (Civ GT) | - | - | ०१ | - | - | - | - | - | मुंबई महाराष्ट्र |

२. **वयोमर्यादा :** वयोमर्यादा ही अर्ज प्राप्तीच्या अंतिम दिनांकानुसार मानली जाईल. म्हणजेच एम्प्लॉयमेंट न्युजच्या या जाहिरातीनुसार २१ दिवस आणि २८ दिवस अंदमान आणि निकोबार बेटातील आणि लक्षद्वीप विभागातील उमेदवारांसाठी. अर्जप्राप्तीच्या अंतिम दिनांकापासूनची वयोमर्यादा ही खालीलप्रमाणे

(अ) सर्वसाधारण - १८ ते २५ वर्षे (ब) अनुसूचित जमाती - १८ ते ३० वर्षे

(क) इतर मागासवर्गीय - १८ ते २८ वर्षे

३. शैक्षणिक अर्हता, तांत्रिक अर्हता आणि आवश्यक कौशल्य खालीलप्रमाणे :

| इव्हेंट्स | सिव्हिल मोटार ड्रायव्हर (CMD) | मजूर | चौकीदार |
|---|---|---|---|
| शैक्षणिक अर्हता | दहावी पास (मान्यताप्राप्त शैक्षणिक मंडळाकडून मॅट्रिक/CMD साठी विद्यापीठ, मजूर आणि चौकीदार | | |
| आवश्यक तांत्रिक अर्हता | जड वाहनांसाठीचे सिव्हिल ड्रायव्हिंग लायसेन्स आवश्यक आहे आणि त्यानंतर असे वाहन चालविण्याचा कमीत कमी दोन वर्षांचा अनुभव आवश्यक आहे. | - | - |
| ऐच्छिक कौशल्य | - | - | चौकीदारीच्या कामात तरबेज असावा याच बरोबर या कामामध्ये एक वर्षाचा अनुभव |

४. जे उमेदवार वरील अटींची पूर्तता करीत असतील त्यांनी त्यांचे अर्ज देण्यात आलेल्या विहित नमुन्यात अर्जासोबत खालील कागदपत्रे जोडून सादर करावीत.

(अ) राजपत्रित अधिकाऱ्याने साक्षांकित केलेले अलीकडच्या काळातील दोन पासपोर्ट आकाराची छायाचित्रे त्यापैकी एक अर्जाच्या उजव्या बाजूला आणि दुसरे **पोचपावती पत्रासाठी** जोडण्यात यावे.

(ब) राजपत्रित अधिकाऱ्याची सही आणि संस्थेचा शिक्का हा अर्जावर निम्मा आणि छायाचित्रावर निम्मा असला पाहिजे. अर्जासोबत जोडण्यात येणाऱ्या सर्व कागदपत्रांच्या झेरॉक्स प्रती या स्वच्छ आणि सुवाच्य असाव्यात. अयोग्य/ अस्पष्ट प्रती किंवा अपूर्ण भरलेले/ चुकीचे अर्ज त्वरित नाकारण्यात येतील.

(क) स्टील कॅमेऱ्याद्वारे घेण्यात आलेले पासपोर्ट आकाराचे रंगीत छायाचित्र अर्जावर आणि **पोचपावती/ प्रवेशपत्रासोबत** चिकटवण्यात आलेले स्वीकारण्यात येतील आणि अस्पष्ट/ स्कॅन केलेले/ डिजिटली काढण्यात आलेले फोटो स्वीकारण्यात येणार नाहीत आणि असे अर्ज त्वरित नाकारण्यात येतील.

(ड) खालील कागदपत्रांच्या जोडण्यात आलेल्या स्वयंसाक्षांकित प्रती स्वीकारण्यात येतील :

(i) शैक्षणिक प्रमाणपत्रे जन्मदिनांकासह नमूद करण्यात आलेली (१० वी आणि १२ वी)

(ii) तांत्रिक कौशल्य प्रमाणपत्र

(iii) जातीचे प्रमाणपत्र

(iv) डिस्चार्ज सर्टिफिकेट फक्त माजी सैनिकांसाठी

(v) जड वाहन मोटार ड्रायव्हरसाठी सिव्हिलियन ड्रायव्हिंग लायसेन्ससह दोन वर्षांच्या अनुभवाचे प्रमाणपत्र फक्त सिव्हिलियन मोटार ड्रायव्हरचे लायसन्स जारी केल्याच्या दिनांकापासून .

(vi) दोन २८ सेंमी. x १२ सेंमी. आकाराची स्वतःचा पत्ता लिहिलेले लिफाफे प्रत्येक लिफाफ्यावर रु. २५ रुपयांची पोस्टाची तिकिटे लावलेली असावीत.

५. **लेखी परीक्षा :** लेखी परीक्षा फक्त त्याच उमेदवारांची होईल ज्यांचे अर्ज विहित नमून्यामध्ये संपूर्ण भरलेले असतील.

(अ) मजूर, चौकीदार आणि सिव्हिल मोटार ड्रायव्हर (CMD) यांच्यासाठी १५० मार्कांची लेखी परीक्षा घेण्यात येईल. प्रश्नपत्रिका ही द्विभाषिक असेल, ऑब्जेक्टिव्ह प्रकारचे आणि दहावीच्या आधारावर प्रश्नांचे स्वरूप राहील. ओएमआर शीट उत्तरपत्रिकेवर उत्तरे नमूद करावीत जी परीक्षा केंद्रांवर देण्यात येईल. प्रत्येक चुकीच्या उत्तरासाठी ०.२५ गुण वजा करण्यात येतील. अभ्यासक्रमाचा वर्ग खालीलप्रमाणेः

(i) सर्वसामान्य बुद्धिमत्ता आणि तार्किक - २५ गुण (ii) सांख्यिकिय क्षमता - २५ गुण

(iii) सर्वसाधारण इंग्रजी - ५० गुण (iv) सामान्य ज्ञान - ५० गुण

(ब) शारीरिक अर्हता/ कौशल्य चाचणीसाठी लेखी परीक्षेच्या गुणवत्ता आधारानुसार उमेदवारांना बोलाविण्यात येईल आणि रिक्त पदांच्या संख्येच्या दहापट मर्यादित असेल.

६. **शारीरिक अर्हता/ कौशल्य चाचणी** : शारीरिक अर्हता/ कौशल्य चाचणी ही अशा उमेदवारांसाठी आयोजित करण्यात येईल जे लेखी परीक्षेमध्ये गुणवत्ता यादीमध्ये पात्र ठरले आहेत. शारीरिक अर्हता/ कौशल्य चाचणीचा तपशील खालीलप्रमाणे.

(अ) **मजूर आणि चौकीदाराच्या पदासाठी शारीरिक अर्हता चाचणी :** शारीरिक अर्हता चाचणी ही मंडळाच्या अधिकाऱ्याकडून आयोजित करण्यात येईल अशा उमेदवारांसाठी जे लेखी परीक्षेत पात्र झालेले आहेत. या चाचणीत गुण असणार नाहीत आणि उमेदवार हे एक तर **उत्तीर्ण** होतील किंवा **अनुत्तीर्ण** होतील.

(ब) **सिव्हिल मोटार ड्रायव्हरच्या पदासाठी शारीरिक अर्हता आणि ड्रायव्हिंग चाचणी**– शारीरिक अर्हता आणि ड्रायव्हिंग चाचणी ही मंडळाच्या अधिकाऱ्यांकडून घेण्यात येईल अशा उमेदवारांसाठी जे लेखी परीक्षेत पात्र झालेले आहेत. या चाचणीत गुण असणार नाहीत आणि उमेदवार हे एक तर **उत्तीर्ण** होतील किंवा **अनुत्तीर्ण** होतील.

**सर्वसाधारण सूचना**

१. उमेदवारांवर भारतात कोठेही सेवा करण्याची जबाबदारी राहील. त्याचबरोबर कामाच्या ठिकाणी सेवेची सुद्धा जबाबदारी असेल. केंद्रसरकारच्या सेवेमध्ये ज्यांचा नवीन प्रवेश होईल ते नवी पेन्शन योजनेसाठी पात्र ठरतील.

२. सर्व अर्ज हे पोस्टाद्वारे पाठवावेत. समक्ष/कुरियरद्वारे पाठविण्यात आलेले अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत. लिफाफ्यावर ठळक अक्षरांमध्ये ज्या पदासाठी अर्ज केला आहे त्या पदाचे नावासह---------------(सर्वसाधारण/इमाव/अजा/अज/ईएसएम/ईडब्ल्यूएस/एमएसपी/अपंग) उल्लेख असावा. जे अर्ज विशिष्ट वर्गवारी नमूद न करण्यात आलेले प्राप्त होतील त्यांना अपूर्ण मानण्यात येऊन ते नाकारले जातील. एका पदासाठी एकच अर्ज स्वीकारण्यात येईल. जे अर्ज विशिष्ट वर्गवारी नमूद न करण्यात आलेले प्राप्त होतील त्यांना अपूर्ण मानण्यात येऊन ते नाकारले जातील. जे अर्ज अंतिम दिनांकानंतर/अपूर्ण प्राप्त होतील ते त्वरित नाकारण्यात येतील आणि याबाबत कोणताही पत्रव्यवहार करण्यात येणार नाही. कृपया लक्षात घ्या की, पासपोर्ट आकाराचे छायाचित्र नसलेले अपूर्ण अर्ज किंवा शैक्षणिक प्रमाणपत्रांच्या/जन्मदिनांक दाखवांत असलेल्या प्रती आणि जातीचा दाखला (लागू असल्यास) जोडला नसल्यास किंवा उमेदवार हा वरील दर्शविलेल्यानुसार अंतिम अर्ज प्राप्तीच्या दिनांकावेळी उमेदवार हा कमी वयाचा किंवा जास्त वयाचा असल्यास अर्ज नाकारण्यात येईल आणि उमेदवारांची भरतीसाठी निवड होणार नाही.

३. कोणत्याही उमेदवारास टीए किंवा डीए देण्यात येणार नाही. लेखी परीक्षेसाठी त्याचबरोबर शारिरीक अर्हता आणि प्रॅक्टिकल चाचणीसाठी जेव्हा बोलविण्यात येईल त्यावेळेस सुद्धा उमेदवाराने त्याच्या राहण्याची व्यवस्था स्वतः करावी.

४. अर्ज निश्चित मानले जाणार नाहीत/ जर सूचनेनुसार नसतील तर, तपशिलानुसार जुळत नसलेले अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत आणि नाकारलेल्या अर्जांबाबत पुन्हा कोणतीही माहिती देण्यात येणार नाही. अर्ज हे फक्त ए ४ साईजच्या कागदावर असावेत आणि **पोचपावती/प्रवेशपत्र** ही सुद्धा ए ४ कागदावर स्वतंत्र असावे.

५. अर्जासोबत कोणतेही मुळ (Original) प्रमाणपत्रे जोडू नयेत. हे फक्त लेखी परीक्षा आणि शारिरिक/कौशल्य चाचणी दरम्यान सादर करावीत किंवा ज्यावेळी सांगितली जातील त्यावेळी सादर करावीत. मूळ कागदपत्रे गहाळ झाल्यास युनिट कोणतीही जबाबदारी घेणार नाही.

६. वर दर्शविण्यात आलेली पदे ही आवश्यकतेनुसार वाढविण्यात/ कमी करण्यात येतील किंवा कोणतेही कारण न देता संपूर्ण पदे रद्द करण्यात येतील.

७. भरतीप्रक्रिया कोणत्याही पातळीवर कोणतेही कारण न देता रद्द/रहित/निलंबित/निरस्त करण्यात येईल.

८. केंद्र सरकारच्या अखत्यारितील जारी केलेले जात प्रमाणपत्र मान्य केले जाईल.

९. केवळ मूलभूत निवडीचे निकष पूर्ण केल्याने परीक्षेसाठी बोलावलेल्या उमेदवाराला आपोआप पात्र केले जाणार नाही.

१०. अतिरिक्त/ जास्त/ उच्च पात्रतेसाठी कोणतेही सवलत दिली जाणार नाही.

११. कोणतेही कायदेविषयक विवाद हे पुणे न्यायाधिकार कक्षेत राहतील.

**ताकीद** : सर्व उमेदवारांना ताकीद देण्यात येते की, स्वयंघोषित एजंट/दलालांपासून सावध राहा. असे कोणतेही प्रकार आढळल्यास उमेदवारांनी **ऑफिसर कमांडिंग, ७५२ ट्रान्स्पोर्ट कंपनी (सिव्हिल जीटी) पुणे पिन- ९००४४९ C/o 56** एपीओ येथ कळवावे.

**ऑफिसर कमांडिंग, ७५२ ट्रान्स्पोर्ट कंपनी (सिव्हिल जीटी)**

**रॉस रोड, रेस कोर्सजवळ, पुणे पिन- ४११ ००१, महाराष्ट्र**